


वेळ सकाळी ९-९॥ ची. बसस्टॉप. रांगेत एकेक नंबर वाढतो आहे. ऑफिसचे लोक, शाळेतली मुले, नोकरी करणाऱ्या गृहिणी सगळेजण बसची वाट पहात आहेत. दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे सगळे विषय इथे चावले जातात. परवाचीच गोष्ट ! शेजारच्या दोन मुली नव्या फॅशन, राजेश खन्ना, हेमामालिनी, क्रिकेट, फुलं, गुलशन नंदा आदी विषयावर बऱ्याच गप्पा मारत होत्या. दोघी कॉलेजमध्ये बरोबर होत्या. बस येण्याची कुठलीच लक्षणं दिसत नव्हती. हे लक्षात येताच त्यांचा विषय एका वेगळ्या दिशेला वळला. आता मात्र मी कान देऊन ऐकू लागले.

'शी ! काय हे ! ९-३५ झाले. केव्हा यायची बस.'

'तुला नक्की कुठं जायचंय. सेंट्रल बिल्डिंगला १२ नंबरची ही बस जाते.'

'मला सेंट्रल बिल्डिंग जवळ जायचंय ! '

'का ग ? कसलं सरकारी काम काढलंय ? '

'छे ग ! तिथं एका ठिकाणी इंटरव्ह्यूला जायचंय !'

'इंटरव्ह्यू ? मी आत्तापर्यंत सात ठिकाणी इंटरव्ह्यू देऊन आले. प्रत्येक इंटरव्ह्यू नंतर एक महिन्यानी दिलगिरीचं त्यांचं पत्र आहेच.'

'तुला असं वाटलं का की हा माझा पहिलाच इंटरव्ह्यू आहे म्हणून ? मी आतापर्यंत नऊ ठिकाणी जाऊन आले. नन्नाचा पाढा अगदी जोरात चाललाय. फक्त एका ठिकाणी बोलावलं पण सांगितलं तुम्हाला पैशाचे व्यवहार करावे लागतील. दोन हजार रुपये डिपॉझिट ठेवावे लागेल. म्हटलं एवढे जर दोन हजार डिपॉझिट म्हणून ठेवू शकत असतो तर कशाला तडफडायला तुम्हाला नोकरी द्या म्हणून तोंड वेंगाडलं असतं ? पूर्वीच्या बायका सकाळी उठल्यावर देवाचं म्हणत तसंच सकाळी उठल्याबरोबर जाहिराती बघायच्या...

कुठे जागा असेल तर लगेच अर्ज टाकायचा. दोन रुपड्या खर्चून इंटरव्ह्यूला जायचं आणि मग निर्लज्जासारखं त्यांचं 'आम्ही दिलगीर आहोत' हे पत्र सुशिक्षित धैर्यानी आणि संयमानी स्वीकारायचं आणि सुशिक्षित निर्लज्जपणानी पुन्हा दुसऱ्या नोकरीला स्वतःच्या हस्ताक्षरात... वय, जन्मतारीख... शिक्षण... पगाराची अपेक्षा वगैरे वगैरे लिहीत अर्ज करावयचा. असं चाललय चार वर्षं फुकट खर्चून बी. ए. झालोत. लाज आणि पश्चाताप वाटायला लागलाय. नोकरीसाठी तंगड्या तोडाव्या लागतील याची कल्पना असती तर कॉलेजात गेलेच नसते.'

'अग ! परवा त्या 'बान्सन अँड बान्सन' कंपनीत इंटरव्ह्यूला गेले. त्यानी अर्जात पगाराची अपेक्षा विचारली होती. मी ४०० रु. लिहिले होते. तो मॅनेजर मला म्हणाला आम्ही १७५ रु. देतो. मी त्याला ठणकावलं. म्हटलं बसलाच दररोज अडीच रुपये लागतात; वरचे १०० घर चालवायला पुरतील का ? तर मलाच म्हणाला की आम्ही १५० रु. दिले तर बी. ए. च काय एम. ए. झालेल्याही मुली मिळतील आम्हाला.'

'तुझी ही रड ! माझी धाकटी काकू बी. एस. सी. बी. एड. आहे. ५०० रुपये पगारावर सही करते, हातात येतात २५० रुपये. दुपारी घरात बसून काय करणार ? तेवढीच दूध आणि भाजी तरी बाहेर पडेल.'

'अलके, आपल्या कॉलेजातल्या आपल्या बॅचच्या अशा तशा १५ जणींना नोकरी लागलीय. बाकीच्या आपण सगळ्या बेकार.'

'तू एम्प्लॉयमेंट एक्सचेंजला नाव नोंदवलस ? '

'छे ! तू ?'

'नाही.'

'सगळ्यानी तिथं नाव नोंदवायला हवं किंवा सरकारनीच सक्तीचं करायला हवं बघ. म्हणजे कळेल या देशात बेकारी किती आहे ते ?'

'नाव नोंदवून तरी नोकरी मिळेल का ग ? मी इतकी वैतागलेय बघ. घरात लहान भाऊही बेकार

आहे. आपण 'सुशिक्षित' पडलो ना ? भांडी आणि धुणीही करता येत नाहीत.'

दोघींच्या अशा तावातावानी गप्पा चालू होत्या. शेजारीच धुणी भांडी करणारी स्त्री होती. ती म्हणाली 'बायानो...धुणी भांडी करून प्वॉट भरतं असं वाटलं व्हय ? आग आजारपन बगायच नाई, पोराबाळांचं बगायच नाई–ऊन नाई, थंडी नाई, पाऊस नाई, काई बगायचच नाई. तवा कुट ८० रुपड्या पदरात पडतात. त्याच्यात पोट भरायचं कुटं...खाणाऱ्या किती तोंडांना द्यायचं. मग त्यांचं शिक्षान बी नाई. माजी तुज्या एवढी पोर बी भांडी–धुणी, केरवार करती, तरी बी फाकं पडल्यात त्ये पडल्यात. बाई आमाला काम हाई ते आसं हाय ! रजा नाय, सुटी नाय, इश्रांती नाय.'

या बाईच्या आवाजानं बाकीचे सगळेच लोक कान देऊन ऐकू लागले. या बाईजवळच्या पोक्तशा बाई म्हणाल्या "पूर्वी मला स्त्रियानी शिकायचं नाही म्हणून चौथीपर्यंत शिकवलं. आताच्या काळात कोण मला नोकरी देणार ? महागाई ही अशी वाढती ! शेवटी मी पापड, कुरड्या करायचा घरगुती उद्योग सुरू केला. कष्ट करून ५० रु. असे तसे महिन्याला मिळतात. पण ते काय पुरतात होय ? कष्ट ढीगभर आणि मिळकत मोहरीभर असं आहे.'

या चौघी एकमेकींकडे नुसत्या बघत होत्या. जसं सुचेल तसं बोलत होत्या. त्या साऱ्याजणींना काम हवं होतं–तरुण मुलींच्या शिक्षणाचा उपयोग नव्हता–आई वडिलांची ओढलेली तोंडं त्यांना दिसत होती–भांडी, धुणी करून पोट भरणाऱ्या त्या स्त्रीला संसारात पोटभर अन्न नव्हतं. तिला मुलांची शिक्षणं करायची होती. पापड लाटणाऱ्या काकूंना त्यांच्या मुलीसाठी हुंडा द्यायला नाहीतर मुलाला शिकवायला म्हणून पैसे हवे होते.

त्यांची नावं मला माहीत नव्हती.

त्या कुठे रहातात ते मला माहीत नव्हतं.

पण हाच प्रश्न असलेल्या स्त्रिया प्रत्येक पेठेत, प्रत्येक घरात, प्रत्येक गावात, प्रत्येक बसस्टॉपवर, प्रत्येक वाड्यात आहेत एवढं मात्र मला निश्चितच माहीत आहे. त्या सगळ्यांचं नाव 'बेकार' आहे हे तर पूर्णपणे ठाऊक आहे. याला कुठलाच उपाय नाही का ?

– बायजा

## भारतातील कामकऱ्यांचे उद्योगानुसार विभाजन (१९७१)

| उद्योग | एकूण कामकरी (आकडे हजारात) | स्त्री कामकरी (आकडे हजारात) | स्त्री कामकऱ्यांचे एकूण कामऱ्यांमध्ये शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| शेती | ७८१७६ | ९२६६ | ११.९ |
| शेतमजुरी | ४७४८९ | १५७९४ | ३३.३ |
| पशुपालन इ० | ४२९७ | ७८३ | १८.२ |
| खाणकाम | ९२३ | १२४ | १२.९ |
| गृहोद्योग | ६३५२ | १३३१ | १८.४ |
| कारखानदारी | १०७१६ | ८६५ | ९.७ |
| बांधकाम | २२१६ | २०४ | ९.२ |
| व्यापार | १००३८ | ५५६ | ५.२ |
| वाहतूक इ० | ४४०१ | १४६ | ३.३ |
| सेवा उद्योग | १५७६५ | २२२९ | १४.१ |
| एकूण | १८०३७३ | ३१२९८ | १७.३ |